# प्रभुतरुण

| वर्ष ४८ | अंक १२ | मुंबई | जून २०१५ | पाने ६ | किंमत रु. १ |
|---|---|---|---|---|---|

( *स्थापना :* तारीख २५ ऑगस्ट १९२३ )


**तत्त्वाचा बंदा जीव । मूर्तीला कोण विचारी?**


**www.prabhutarun.org**

*संपादिका:* **सुहासिनी कीर्तिकर** *कार्यकारी संपादक मंडळ :* **मिनाक्षी जयकर, मयुरा नायक, संजना कोठारे, वैजयंती कीर्तिकर**

*सहाय्यक संपादक:* **त्वरिता दळवी, राजेश नवलकर, भक्ती शेटचे**


*संपादकीय*

## अगंबाई! अरेच्चा!

—सुहासिनी कीर्तिकर

**कृतज्ञ स्मरण**



**विहंग नायक**

मी नुकतीच एका छान आगळ्या संवादात रमले होते. आगळा का? तर तो एकतर्फी शब्दविहीन होता; किंवा शब्दांच्या अर्थाशिवाय होता. पण निरर्थक अजिबातच नव्हता. फक्त आवाज किंवा स्वर. त्या स्वराभोवती अनेक भावनांची आवर्तनं. ही आवर्तनं दोन जीवांची भावभेट घडवणारी. म्हणून तो खऱ्या अर्थाने 'शब्देविण संवादु'! माझी दोन, तीन महिन्यांचे वय असलेली नात. तिला स्वरांची जादुमय दुनिया जणू अचानक कळली! 'आ आऽऽ' असा आवाज 'आ' वासला की घशातून काढता येतो. अरे व्वा? मग त्या 'आऽऽ'चं कधीतरी 'आ अम्' नकळतच झालं की. शिट्टी वाजवल्यासारखा हा आवाज काढला की गंमतच. मग त्या आवाजाला दाद देणारं हसणं. गंमत कळल्याच्या आनंदाचं कोवळं, निरागस गालांचे रसगुल्ले अधिकच फुलवणारं. जीभेला ओठात पकडून ठेवणारं. दोन्ही छोट्या डोळ्यांत हसरं कौतुक साठवणारं. हा व्यक्त होताना स्वत:शीच आनंद भोगणारा संवाद. निशब्द! ह्या आनंदाची 'लागण' होते मग घरातील सर्वांनाच. मग ही शब्दार्थ जाणणारी, मोठी म्हणवणारी माणसं तिच्याशी तसाच संवाद साधत रहातात. आऽऽच्छऽऽम्; बुऽऽशुशु...क, अर्रर्र, च्यकच्यक, डम्डम्, हाऽऽहाऽऽहाऽऽ ..... असं काहीही. फक्त स्वर आणि आवाज यांच्या रसायनातून साधणारा विलक्षण भावुक संवाद! कधी एखादा जाणता ओठांचा चंबू करून 'ओऽऽम्' म्हणतो अशावेळी. तर ओठांचा चंबू करून आवाज काढता येतो; हे नवीनच रहस्य कळते त्या बाळजीवाला. मग आश्चर्याने थोडा 'पॉझ'. नाकपुड्या फुललेल्या. डोळ्यांत नवलाईचा भाव. दोन क्षणानंतर हातपाय हलवून, हलवून आनंद. त्या चिमुकल्या ओठांचाही चंबू होतो. पण आवाज मात्र नाऽऽही! एवढं मात्र त्या जीवालाही कळतं की घशातून येणारा आवाज हा ओठांच्या कसल्यातरी हालचालीतून वेगळा बनतो. (म्हणूनच ना; बाळ भाषा शिकताना अनुकरणातून ओष्ठ्यवर्ण आधी शिकतं. जसं की पम्पम्, बाऽबा, माऽमा, मम्मम्, पाऽऽपा. पाणीसुद्धा या भाषेत 'पा' बनतं अन् जेवण (दूधभात) मंमं. हळूहळू 'भू भू', 'भूऽऽर' कळत जातं.) या आवाजाला साथ देते देहबोली. अगदी जन्मल्यापासूनच. रडणं, हसणं जन्मजातच. हातपाय हलवणं, हळूच किंचितशी कंबर उचलून हूं हूं करत 'मला घे' शब्दांशिवाय व्यक्त होतं. त्या बाळाबरोबर संवाद साधणारी मोठ्या माणसांची देहबोली तर आणखीनच विविधांगी. माना हलवून हलवून आवाज काढणं, टाळ्या वाजवणं. वाटी चमच्याचे आवाज वाद्य म्हणून करणं, खेळण्यांचे नाद करणे, उड्या मारणं, नाचणं, गिरक्या घेणं, कवितागाणी म्हणणं, अंगाई म्हणणं इ. इ. धमाल करत ही मोठी माणसं आपल्यातलं 'मूल' पुन्हा एकदा सांभाळत असतात. म्हणजे बाळाबरोबर संवाद साधता साधता त्यांच्या स्वत:चा आनंदी जगाचा नव्यानं प्रवास सुरू होतो जणू. 'प्रौढत्वी निजशैशव' जपणारा हा

(पान २ कॉलम १ वर)

*विस्तारीत संपादकीय*

## Weekend Dairies

-Rajesh Navalkar

With the Summer Vacations coming to an end and while we await to bid goodbye to the sizzling summers what one looks forwards to is the arrival of Monsoon and with that the related goodies that the Nature has to offer to us…

I personally love the Rains. A lot of people I know do not agree to my sentiments, however I reserve my feelings to myself . Speaking of rains .. What comes into the minds of the "not so happy with rains" people are the potholes, the mucky roads, the wetness all around … all this are the first visions of the rainy season to them ...

Well … when it comes to Me .. I look forward to the first smell of the mud around you, .. the wash that happens to the trees and leaves which are otherwise soaked in dust … the dark clouds , the thundering and lightning .. the sprays of the rains lashing around .. the flora and fauns which rejuvenates .. the magical Rainbow …all these things turn me On. May be its got something to do with me being a Piscean…. luv water always ..

Monsoon is the right season for Outings .. for the adventurous and also for the not so adventurous people.. one needs to enjoy rains to the fullest to experience the feel… there hasn't been a single year so far where I have not gone to Marine Drive in Mumbai during monsoon to see the wild sea and have waited for the waves to lash on the bay and spray the sparkles on your face .. its an experience that one feels and enjoys … "Rim Zim Gire Savan" .. is a spontaneous Kishore Kumar number which I hum whistle enjoying the rains …

Our daily cuisine also changes according to the weather. .. with the trawlers docking on the bay .. seldom fish is available for grabs ….. then comes out the Sode Batati , dried bombil fried crispy with masala , Javlyachi Bhaji … also love the tiny bombil which you get during that season…. Kanda Bhaaji being the favorite snack of the season . .. it gives such a pleasure sipping hot coffee .. having kanda bhaaji and seeing the rains outside the window…

With the arrival of Monsoon, one looks forward for the Weekends … to hit to the roads.. to the hills … One cannot afford to miss the amazing flora and fauna which Nature Offers us during the season. Picturestic landscapes .. sparkling waterfalls .. flowing rivers .. its amazing to see how rains transforms life into everything around you.

I love watching Waterfalls .. It gives one a feel of the might of Mother Nature .. There are a number of such awesome spots around Mumbai and Maharashtra which are a must visit for monsoon enthusiast's. .. infact I can list down a few incase you guys want to venture out and try out the sites … Close to Mumbai .. On the Mumbai Pune express highway .. between Lonavala and Khandala is the Kune falls ..also known as the Liril falls where the Liril Ad was shot .. .. the next amazing sight is the Thosegar waterfalls at Satara … you can actuall feel the pressure while you watch the fall from a distance .. Lingamala Waterfalls is again a must watch fall which is near the

(पान २ कॉलम ३ वर)

(पान १ कॉलम २ वरून)

संवाद खरं तर हवाच असतो. नाहीतर होतं काय? आपण आपल्या रोजच्या संसारात, उद्योगात, छंदात, जगण्यात इतके मुरत जातो की काही वेळा 'इतुके आलो जवळजवळ की जवळपणाचे झाले बंधन' अशी अवस्था वाटऱ्याला येते. हे बंधन तोडायचे तर असा मुक्त आनंद देणारा संवाद हवाच असतो. स्वत:शी, परस्परांशी संवाद. जाणत्याचा निरागसतेशी निरर्थक तरीही अर्थपूर्ण सुख देणारा सुसंवाद. म्हणूनच चांगल्या संवादाला 'सुखसंवाद' म्हणत असावेत बहुधा.

असा सुखसंवाद निखळ प्रेमातूनच झरतो. त्याला व्याकरण नसते. परंपरेतून आलेले शुद्ध शास्त्रीय भाषाभानही नसते. दो जीवांचे एक मन झाले की 'डोळ्यात वाच माझ्या तू गीत भावनांचे' असे सांगायची गरजच उरत नाही. डोळे आपोआप 'जुल्मी गडे' वाटू लागतात. ज्ञानेश्वरांनी अमृतानुभवात अद्वैताची मांडणी करताना डोळे कान झाले, कान जिव्हा, जिव्हा डोळे; असे परस्पर इंद्रियकार्य सरमिसळ होत तीव्रता व्यक्त करताना दाखवली आहे. डोळ्यांची ही नजरबंदी करणारी भाषा स्पर्शाने अधिक गहिरी होते. स्पर्श या माध्यमातून होणारा सुखसंवाद तर अतीव सुखाचा. तिच्या तळहातावरील सुपारी आपल्या दो बोटांनी उचलताना होणारा पुसटता स्पर्श तिच्या मनात काहूर उमटवू शकतो. इंदिरा संतांनी तो कवितेत मांडताना 'दो बोटांचे' पाखरू दाणा टिपताना दाखवले आहे. 'मिठीत तुझिया या विश्वाचे रहस्य मज उलगडले' असे भान देणारा स्पर्श 'शब्दांवाचून कळले सारे' या आत्मत्वाचा असतो. सध्या हापूसचा मोसम आहे. आंबा खाण्याची वस्तू. पण त्याआधी विंदांनी तो नजरेने कसा खावा, त्याचा उबदार-हवाहवासा स्पर्श कसा भोगावा ते आपल्या एका लेखात सांगितले आहे. 'प्रत्येक कलावंत हा स्पर्शवादी असतो' असे ते म्हणतात. (हो! हो! 'विंदा' म्हणजेच आपले गो. वि. करंदीकर. लेख म्हटल्यावर 'गो. वि.' म्हणायला हवे.) 'हिरवे हिरवे गार गालीचे हरित तृणाच्या मखमालिचे' म्हणणारे बालकवी तरी काय? हिरवा रंग डोळ्यांना दिसणारा; पण त्याचा 'गार' स्पर्श अन 'मखमाली' स्पर्शच डोळ्यांनी अनुभवताना कवितेत भेटतात. उत्कट स्पर्शभाषा शब्दातीतच असते. एखादे सुंदर शिल्प पाहिले की नकळतच त्याला बोट लावून पहावेसे वाटते ते याचकरिता. प्रवासाच्या भयानक गर्दीत एखादे छोटेसे मूल दिसले की त्याला उचलून घ्यावेसे वाटते. मग गर्दीची ऐशीतैशी. ती अनामिक सुखाची, जंजाळाची आठवण पुसट करणारी वेगळीच निर्हेतुक, आनंदी भाषा असते.

आपल्या पंचेंद्रियांची संवादाची माध्यमं अशी वेगवेगळ्या उत्कट क्षणी आपापली कामं बदलतात; किंवा एकचित्रपणे भाषा माध्यमं बनून संवाद साधतात. म्हणूनच सतार झंकारत असताना ती आपण कानांनी ऐकतो. पण त्याचवेळी डोळे मिटून घेतो. अंतर्चक्षुंनी ते दिव्य संगीत तल्लीन होऊन अशावेळी ऐकतो. चांगले गाणे ऐकताना ना गायक डोळे उघडत, ना श्रोता. सगळी इंद्रिये आपले भान फक्त कर्णेंद्रियाशी एकवटतात. गायकही स्वत: आपल्या हाताने कानांची ओंजळ सुरांनी भरली आहे की नाही; ते मिटल्या डोळ्यांनी अनुभवतात. पुन्हा ज्ञानेश्वरांचा मासला द्यायचा तर 'फुलेचि झाली भ्रमर। तरुणीची झाली नर' असा हा इंद्रियांचा 'कळंभा' (= भांडण) नसणारा, इंद्रियातीत अनुभव.

हा अनुभव घेतल्याविना आत्म्याशी संवाद होणे नाही. हा संवाद मंडळी, माझ्या-तुमच्यात दर महिन्यांनी माझ्या लेखातून होतच असतो. (पण तो शब्दांतून) एकतर्फीच पण. आनंदाची बाब अशी की यावेळी सौ. त्वरिता दळवींच्या विस्तारित संपादकीयाला पत्राने तुमची संवाद साधणारी दाद मिळाली आहे. परस्पर संवादातील हे पाऊल. पाउले अशीच चालत राहू द्या. मगच संवादातील गंमत वाढेल. तुमच्या आमच्यातले मैत्र वाढेल. शब्दस्पर्शातून, लेखन संवादातून विचारांच्या देवाणघेवाणीतून; सुख संवादातून छाऽऽन मेळ जमेल. मग आपण अनावर आनंदाने म्हणू.... अगंबाई! अरेच्चा!!

*

## पत्र प्रतिक्रिया

अनिल पू. राव
७ जीवन पराग, प्रभात कॉलनी रोड २,
सांताक्रुझ पूर्व, मुंबई - ४०००५५.
२१-०५-२०१५

श्रीमती सुहासिनी कीर्तिकर
संपादिका, प्रभु तरुण यांस
स. न. वि. वि.

प्रभुतरुणाचा 'मे' चा अंक कालच मिळाला. लगेच वाचून काढला. कित्येक दिवसांनी एक सुरेख लेख वा विचार विस्तारित संपादकीय सौ. त्वरिता संजय दळवी यांच्या 'या चिमण्यांनो' या लेखात वाचायला मिळाला. सौ. त्वरिता दळवी यांनी मांडलेल्या विचारांशी मी सहमत आहे. आज पाठारे प्रभु अल्पसंख्यांक आहे व आपली संस्कृती, चालीरीती, परंपरा काही कमी होत चालल्या आहेत. याचे मुख्य कारण म्हणजे अधिक प्रमाणात होणारे आंतरजातीय विवाह. त्यातच सर्व कुटुंबे पसरलेली आहेत. तेव्हा एकत्र येणे, संवाद होणे, चर्चा होणे इत्यादी आजच्या धावत्या जीवनक्रमातून होत नाही. तेव्हा मला असे वाटते चर्चा होण्यासाठी सुसंवाद होण्यासाठी 'अत्रेकट्टा' प्रमाणे 'पाठारे प्रभु कट्टा' होणे गरजेचे आहे. भले तो मुंबईच्या उपनगरात होउ दे. आठवड्यातून एकदा या कट्ट्यावर पाठारे प्रभु येतील व सुसंवाद चर्चा, गोष्टी इत्यादी करू शकतील, त्यामुळे आपण एकमेकांशी संपर्कात राहू असे मला वाटते.

आपला
अनिल पू. राव

विस्तारीत संपादकीय

(पान १ कॉलम ४ वरून)

Venna Valley of Mahableshwar. While on your way to Matheran from Neral stations you will come across the Peb Falls … 5 kms from Devrukh at Ratnagiri are the Marleshwar falls which is also a great sight to see… Infact .. Mahableshwar, Matheran, Khandala, Lonavala are places which offer amazing falls to enjoy. **But the Mother of all falls according to me is the "Dudhsagar Falls".**

Dudhsagar Falls (literally Sea of Milk ) is a four-tiered waterfall located on the Mandovi River in the state of Goa. It is 60 km from Panaji by road and is located on the Madgaon-Belgaum rail route about 46 km south of Madgaon and 60 km north of Belgaum. Dudhsagar Falls is amongst India's tallest waterfalls with a height of 310 m(1017 feet) and an average width of 30 metres (100 feet). It is a breath taking sight while in the train .. One must have seen the location with was shot in the movie Chennai Express.

The falls is located in the Bhagwan Mahaveer Sanctuary and Mollem National Park amongst the Western ghats. The waterfall forms the border between Karnataka and Goa states. The area is surrounded by a deciduous forest with rich bio diversity.

The nearest rail station accessible by road to the falls is Castle Rock station. Visitors could get in a train from here and disembark at the Dudhsagar stop. It is to be noted that the Dudhsagar rail stop is not a station where passengers can expect a platform. Passengers and visitors have to climb down the steep ladder of the rail compartment in a short 1-2 minute unscheduled stop. From this rail stop, visitors have to walk about a kilometer on the tracks to arrive at the falls. Caution needs to be exercised when planning a trip to the falls with elders or children. There are many outdoor adventure organizations that organize monsoon treks to Dudhsagar for people interested in adventures that includes trekking from Castle Rock and camping under the falls for a night.

Weekend Outings during Monsoon are best in the hills with so much to enjoy. All the hill stations close down the business .. only enthusiast trekkers or picnickers are seen around the hills. Off season rates apply to the hills making the journey more economical.

With such a burst of Nature .. Monsoon forms the best adventurous season for me.. be it travel ..or be it Photography .. you always tend to get the best shots. One has to witness the aftereffects of the season at "Kaas Plateau" at Satara … which is a Valley of Flowers.

Best visited during mid September to mid October.. The Kaas Plateau also known as the "Kaas Pathar" is a platue situated in the Western Ghat Sahyadri range, and is known for various types of wild flowers which bloom every year. It has been declared as Biodiversity World Heritage Site by The United Nations Educational Scientific and Cultural Organization (Unesco The place has more than 850 different species of flowers and other plants including Orchids, Karvy and carnivorous plants such as Drosera Indica. This falls under the Sahyadri Sub Cluster of Western Ghats which is now a UNESCO World Heritage Site. Kaas is again a must visit site according to me.

I can go on and on with my affection for the season,… being the best for my Photographic Expeditions and Tours … I wish everyone a Very Happy Monsoon ..Let your hair down … Do get Wet .. .. Be a child all over again .. Its Natures Gift to all .. Respect it and Enjoy !!!

## प्रभु प्रभात वर्धापनदिन

दिनांक १७ मे रोजी प्रभुप्रभाताचा वर्धापन दिन मुंबई मराठी साहित्य संघात श्री. अनिल पू. राव यांच्या अध्यक्षतेखाली साजरा झाला. या वर्षी श्री. दिलीप कृष्णकांत नवलकर, श्री. श्रीलेश सूर्यमाधव त्रिलोकेकर, सौ. मीना संदीप तळपदे यांना विद्येश्वरी पुरस्कार देण्यात आले. डॉ. मंतल नायक, सौ. स्मृती तळपदे, सौ. विंदा कीर्तिकर, श्री. सुकुमार राणे, श्रीम. ज्योत्स्ना झावबा, श्री. राजन प्रधान, श्री. निकेत नवलकर, कु. कौमुदी राणे, कु. शिल्पा जयकर सुवर्ण पदकांचे मानकरी होते. दरवर्षीप्रमाणे नाट्यप्रयोग सादर झाला. प्रभुप्रभातला वर्धापनदिनी शुभेच्छा

लेखांक-६

# अर्थसंवाद

-सौ. उर्वशी आनंद धराधर

‘भेटीलागी जीवा लागियली आस’’ आता माणसांची एकमेकांना प्रत्यक्षात भेट जरी दुर्मीळ झाली असली, तरी फेसबुक, व्हॉटस् अप, ट्विटर, मोबाइल, ई-मेल द्वाराही भेट होत आहे. दुधाची तहान ताकावर भागवावी तसे काहीसे या भेटीत वाटते. पण आपला एकमेकांशी अप्रत्यक्षरित्या संवाद तरी साधला जातो यात मानसिक समाधान मिळवून घेण्याची सवय आता आपणा सर्वांना होत आहे. ही नवनवीन तंत्रज्ञान निर्मितीची प्रगती आपणास हळूहळू सुखावते आहे. बँकींग व्यवसायातही याचा फायदा आपण घेत असतो. पूर्वीचे बँक- काऊंटर वेळ जपण्याचे आता मुळीच कारण नाही. एटीएमद्वारे पैसे काढणे व भरणे, धनादेश स्वीकारण्याच्या कक्षात तो देणे, मोबाईलद्वारा आपल्या खात्यातील शिल्लक जाणून घेणे. या सर्व गोष्टी आता दिवसभरात नव्हे तर २४ तासात कधीही करता येतात. आता म्हणूनच दर महिन्याच्या दुसऱ्या व चौथ्या शनिवारी बँका खातेदारांसाठी बंद ठेवण्याची सूचना भारतीय बँकांनी मान्य केली व ती आता १ जुलैपासून अमलात येईल. आपला सर्वांचा बँकेत जाऊन व्यवहार करण्याचा वेळ त्यामुळे वाचेल. मोबाईल अथवा इंटरनेट बँकींगची सुविधा जास्तीत जास्त खातेदार घेतील. बँकींग व्यवहारातील हा बदल स्वागतार्ह आहे.

बँकींग व्यवसायात अशा तऱ्हेने संवाद साधण्याचे व आपले व्यवहार पूर्ण करण्याचे अनेक चॅनेल आहेत. बँकिंग आता इलेक्ट्रॉनिक बँकिंग झाले आहे. परंतु या नवीन सुविधांचा जास्तीत जास्त वापर करायला जो ग्राहक लवकरात लवकर शिकेल; तो ग्राहक जास्त समाधानी होऊ शकेल. केव्हाही आणि कोठेही दिवसाचे २४ तास वर्षाचे ३६५ दिवस ग्राहक या चॅनेलमुळे बँकेशी जोडला गेला आहे. गावोगावी रस्त्यारस्त्यात दिसणारे एटीएम्स, दुकानात वापरात असलेली डेबीट व क्रेडीट कार्डाची मशिन्स, इसीएस द्वारे चेकचा खात्यात स्वीकार, टेलीफोन व वीजेची बिलभरणी बँकेद्वारे थेट करण्याची सोय या साऱ्यांमुळे प्रत्यक्ष बँकेत जाऊन व्यवहार करण्याची गरज आता उरली नाही.

प्रत्येक बँकेच्या वेबसाईट द्वारा त्या बँकेची माहिती आपणास मिळू शकते. बँकांच्या ठेवीवरील मुदतीनुसार असलेले व्याजदर, बँक आपल्या ग्राहकाला कर्ज देताना आकारणारे व्याजदर, कर्जाची मुदत व नियम या साऱ्यांची माहिती बँकांच्या वेबसाईटवरून आपण पाहू शकतो. इतरही बँकांच्या वेबसाईटवरून आपण पाहू शकतो. इतरही बँकांच्या वेबसाईट वरील ही माहिती वाचून आपण त्याची तुलना करून आपणास सोयीची वाटणारी बँक निवडू शकतो. पण ह्या वेबसाईट वापरताना ती बनावट वेबसाईट नाही व इंटरनेट बँकींगद्वारे व्यवहार करताना आपण आपला पासवर्ड कसा सुरक्षित ठेवला पाहिजे या सूचना बँका वेळोवेळी ग्राहकांना देत असतात. परवाच एका ग्राहकाला एक मोठे बक्षिस लागल्याची मेल आली. त्याद्वारे बक्षिसाची रक्कम खात्यामध्ये जमा करण्यासाठी त्याचा खातेक्रमांक व पासवर्ड देण्यास सांगितले. पण खातेदार हुशार होता. त्याने आपला पासवर्ड कोठेही सांगू नका या बँकांच्या येणाऱ्या सूचना लक्षात घेऊन आपला पासवर्ड व खातेक्रमांक लिहिला नाही व त्याच्या खात्यातून होणारी हेरगिरी थांबली. नाहीतर त्याच्या खात्यातील पैशांची अफरातफर झाली असती.

वेबसाईटवरून व्यवहारात घेण्याच्या दक्षतेबरोबर बँकेच्या प्रॉडक्टस्‌ची योजना, नियम, फायदे या सर्वांची माहिती मिळू शकते. त्याचबरोबर इतरही बँकांची वेबसाईट आपण पाहू शकतो. मग आपणास कोठली बँक जास्त फायदेशीर आहे ते ठरवून त्या बँकेबरोबर आपण व्यवहार करू शकतो.

बहुतेक बँकांची कॉल सेंटर असतात. त्यांचा टोल फ्री नंबर फिरवून आपण आपल्याला हवी असलेली माहिती मिळवू शकतो. तेथील कर्मचारी ग्राहकांच्या प्रश्नाला योग्य ती उत्तरे देण्यासाठी तत्पर असतो. त्यामुळे घरबसल्या आपणास बँकेची माहिती मिळते.

या ई बँकिंगमुळेच २४ तास बँकींग शक्य झाले आहे. बँकेत धावत पळत जाऊन रांगेत उभे राहणे व आपला नंबर येईपर्यंत थांबणे याची आता गरज राहिलेली नाही. बँकांनाही ई बँकिंगची सेवा जास्तीत जास्त ग्राहकांना द्या अशा सूचना रिझर्व्ह बँक वेळोवेळी करत असते. बँकांना त्यामुळे आता गावोगावी शाखाविस्तार करण्याऐवजी ई बँकींगचा व्यवहार जास्त वाढविणे फायद्याचे होत आहे. बँकांचे हे ई बँकिंग व्यवहार बँकांच्या सर्व शाखा कोअर बँकींगने एकत्र जोडल्या गेल्यामुळेच शक्य झाले आहे. तंत्रज्ञानाची ही प्रगती आज बँकींग व्यवहार अनेकापर्यंत सुलभरित्या पोहचवत आहे. ग्राहकांना तऱ्हेतऱ्हेचे प्रॉडक्टस् आज बँका देत आहेत.

आपल्या खात्यातील एखाद्या रकमेचा चेक पास होण्यापासून थांबवायचा असेल किंवा आपल्या खात्यात एकादी रक्कम जमा झाली असेल किंवा खात्यातून काढली असेल तर या सर्व सूचना तत्परतेने आपल्याला मोबाईलवर एसएमेस् द्वारे मिळतात व आपल्या खात्यातील व्यवहाराची नीट दक्षता घेतली जाते. पैसे एटीएमने काढल्यावर डेबीट कार्ड अथवा क्रेडीट कार्डद्वारे खरेदी केल्यावर लागलीच मोबाइलवर मेसेज येतो. त्यामुळे खात्यातील गैरव्यवहार टाळता येतात. शिवाय इंटरनेट वरून आपण आपल्या खात्याचे स्टेटमेंट पाहू शकतो.

आपणाला एका खात्यातून दुसऱ्या खात्यात पैसे पाठवायचे असतील अथवा कर्जाचे हप्ते भरायचे असतील तर आपण इंटरनेटद्वारा तशा सूचना बँकेला देऊ शकतो. आपण आजच्या तरुण मुलांना इंटरनेटवरून घर बसल्या वस्तू खरेदी करताना पाहतो. बँकेच्या व्यवहाराचे इंटरनेट रुपांतरमुळेच ते शक्य झाले आहे. क्रेडिट कार्ड दुकानात वापरताना दुकानदार आपल्याकडील ‘पॉईंट ऑफ सेल’ मशीन वापरतो. डेबीट कार्डने वस्तू खरेदी केल्यास त्वरित मेसेज मिळतो. कधीतरी असेही होते की आपल्याला मेसेज येतो पण दुकानात आपले कार्ड चालत नाही असे सांगितले जाते. अशावेळी आपल्या बँकेला त्वरीत तशी सूचना द्यावी लागते. मग तांत्रिक बिघाडामुळे जर आपल्या खात्याला चुकीचे डेबीट पडले असेल तर बँका ते तपासून आपणास ती एन्ट्री रिव्हर्स करून देते. आपण बँकेला हे त्वरित कळवणे गरजेचे आहे. काही ठिकाणी किऑस्कसारख्या मशीनवर ग्राहक स्वत:चे पासबुक भरून घेऊ शकतो.

थोडक्यात बँकिंगच्या या सर्व चॅनेलची नीट माहिती घेऊन त्याबद्दलच्या सुरक्षिततेच्या सूचना नीट अभ्यासून आपण ई बँकींगची सुविधा, त्यांचे कार्य, विशेषत्व समजून वापरात आणू शकतो. एकदा का त्यांचा वापर करायला आपण शिकलो की मग आपल्यालाच वाटते, ‘मी हे सर्व शिकायला उगीचच उशीर केला. किती सोपे सोयीस्कर आहेत हे सर्व चॅनेल्स.’ शिवाय एका बँकेचे एटीएम् कार्ड दुसऱ्या बँकेच्या एटीएम् मशीनवरही आपण वापरू शकतो. हे पेमेंट नेटवर्कसिस्टिम शेअर केल्यामुळेच शक्य झाले आहे. आता मनीऑर्डर, डिमांड-ड्राफ्ट यांचा वापर कमी झाला असून एनइएफटी, आरटीजीएसद्वारे पैशांचे व्यवहार त्वरित होतात.

यामुळे पैशाचे व्यवहार जलद गतीने होऊ लागले आहेत. बँकिंग सोयींची ही धावती गती व्यवहाराला खूप छान चालना देते आहे. मोबाईल मुळे तर बँक आता आपल्या खिशातच आहे. या सर्वच प्रगत तंत्रज्ञानाने लोकांच्या सवयी बदलल्या आहेत. लोकांनीही वेगाने तंत्रज्ञान आत्मसात करायला सुरुवात केली आहे. बँकांनी सेवा घ्यावी व लोकांनी ती भरभरून द्यावी अशी स्थिती आता निर्माण झाली आहे. पण हे व्यवहार अत्यंत दक्षतेने केले पाहिजेत. आपला बँकेतील पासवर्ड सुरक्षित ठेवला पाहिजे व तो दर सहा महिन्यांनी बदलला पाहिजे. आव्हानात्मक बँकींग थोडीशी सुरक्षितता बाळगली तर आपण सहजच यशस्वी करू शकतो. मग देशाच्या प्रगती व आर्थिक प्रगतीचे द्योतक असलेल्या बँका आपणास नक्कीच समृद्ध करतील.

*

हसरी रेखा -प्रदीप कोठारे



**बालविभाग**

# Global Warming!

**- Aditi S. Desai**

**Age 10 years**

Today morning, I went to a shop to buy mosquito coil. To my surprise! I saw a mosquito newspaper. Then I also noticed that shop was not run by shopkeepers but by mosquitoes. Then I noticed some very interesting products like the mosquito buzzing C.D, a mosquito dance C.D known as 'DAS DANCE'! or D.D. It also included the newspaper. I bought the newspaper, the song C.D. and the dance C.D. in exchange of three drops of my blood. See how expensive it is!

I reached home and started reading the newspaper with great curiosity. Then I came across a breaking news on the front page. The news was about summer stroke. In Telangana due to summer stroke 432 people died and mosquitoes died in thousands. So sad! But so cheerful news for me.

I was cheerful because my aunt lives in hyderabad the capital city of Telangana. A week ago we had a telephonic chat. She told me about the summer atmosphere. She continued and said that the temperature was above 47. She said, she takes her little daughter, every evening down for a walk. Taking her child in a pram would be difficult for her to use the stairs; so she uses the lift. While going down or coming up in the lift was a difficult thing for her to do because in the lift lived many mosquitoes who used to bite them. But now my aunt is really happy because all of them have died due to the heat. This fact gave an idea of the mosquito shop and the mosquito newspaper.

So, how is my idea of mosquito newspaper? Isn't it a great news for you?......!!




## पाठारे प्रभु सोशल समाज

पाठारे प्रभु सोशल समाजातर्फे रविवार दि. १२ जुलै २०१५ रोजी ''वेस्ट पाम बीच रिसोर्ट'' वसई येथे वर्षा सहल आयोजित केली आहे. सहल वर्गणी रु. ९००/- व ३ ते १० वर्षापर्यंतच्या मुलांना रु. ५५०/- प्रत्येकी. निराशा टाळण्यासाठी त्वरा करा.

शनिवार दि. १ ऑगस्ट २०१५ रोजी पा. प्र. चॅरिटीझचे व्यंकटेश मंदिर ठाकुरद्वार येथे 'अभंगयात्रा' संपन्न होईल. इच्छुक गायकांनी अवश्य लाभ घ्यावा.

रविवार दि. २३ ऑगस्ट २०१५ रोजी पा. प्र. सोशल समाजाची वार्षिक सर्वसाधारण सभा प्रभु सेमिनरी शाळा सभागृह, भाई जीवनजी लेन ठाकूरद्वार येथे सा. ५ वा. होईल. सर्व सभासदांनी याची नोंद घ्यावी.

अधिक माहितीसाठी संपर्क :-

स. चिटणीस सौ. नीता सेंजीत ९८२०१६६६२८ श्री जयंत कीर्तिकर ९८६७९५८५३५

*

## पाठारे प्रभु महिला समाज

पाठारे प्रभु महिला समाजाने 'शताब्दी वर्षा प्रीत्यर्थ' रविवार ३ मे रोजी खारच्या पाठारे प्रभु को. ऑप. सोसायटीच्या सांस्कृतिक केंद्राच्या सभागृहात 'पाठारे प्रभु रुचिरा' ही १८ वर्षावरील मुली व महिलांसाठी व ९ ते १५ वर्षापर्यंतच्या मुलांमुलीकरिता 'ज्युनियर मास्टर शेफ' स्पर्धा आयोजित केली होती. ५ ते ८ वयाच्या बालकांचा 'गंमत गट' देखील होता.

स्पर्धेचे परीक्षक शेफ तुषार देशमुख होते. 'रुचिरा' स्पर्धेत २१ भगिनी व ज्युनियर मास्टर शेफ मध्ये ७ मुलामुलींनी भाग घेतला होता. गंमत गटात ९ बालके होती.

'पाठारे प्रभु रुचिरा' प्रथम विजेतीसाठी रु. ५००० सौ. वृंदा जयकरकडून, द्वितीय क्रमांकाला रु. ३००० श्रीमती प्रमिला तळपदे कडून, तृतीय क्रमांकाला रु. २००० सौ. स्वाती जयकरकडून, तिन्ही विजेत्यांना सौ. सुजाता व श्री. तुषार कीर्तिकरकडून भेटवस्तू, सौ. बिंबा नायककडून मायक्रोव्हेवची भांडी, सौ गौरी नायककडून रवी, सौ. निकेता राणे कडून पैठणीच्या पर्सेस, सौ. ईश्वरी जयकर शहाकडून 'डायमंड सेट', श्रीमती प्रमिला तळपदेकडून पाककलेचे पुस्तक, तसेच श्रीमती वंदना नवलकरकडून 'रुचिरा विजेतीस' पैठणी, उपविजेती क्र. १ ला सौ. मेघना राणे व सौ. उत्तरा कोठारेकडून साडी. उपविजेती क्र. २ ला सौ. अपेक्षा राणे तिवारीकडून साडी अशी बक्षिसांची लयलूट होती.

'ज्युनियर मास्टर शेफ' रु. ३००० उपविजेता क्र. १ ला रु. २०००, उपविजेता क्र. २ ला १००० (समाजातर्फे) तिन्ही विजेत्यांना बेकरी सेट, चॉकलेट मेकींग सेट, १ किलो चॉकलेट सौ. बिंबा नायक कडून व स्पेशल बक्षीस श्री. सुनिल जयकरकडून होते.

'पाठारे प्रभु रुचिरा' किताब सौ. कल्पना उल्हास कोठारे तिने पटकावला व ती क्राऊनची मानकरी ठरली. उपविजेती क्र. १ श्रीमती सीमा नारायण अजिंक्य व उपविजेती क्र. २ कु. गंधाली संजय दळवी आली.

'ज्युनियर मास्टर शेफ' विजेता कुमार ध्वनीत विनेश तळपदे तसेच उपविजेते क्र. १ कुमारी वैभवी पुष्कराज कोठारे उपविजेते क्र. २ कुमारी शनाया मनिष धैर्यवान ठरले.

नीटनेटकेपणा व सजावटीकरीता स्पेशल बक्षीस सौ. विद्या विजय त्रिलोकेकर ह्यांना देण्यात आले.

सौ. ईश्वरी जयकर शहाने डायमंड गोल्ड ज्वेलरीचे प्रदर्शन भरविले होते. त्यांनी लकी डिप्स ठेवले होते. त्यात कुमारी शिवानी सुनिल नवलकर ह्यांना डायमंड ज्वेलरी सेट मिळाला.

स्पर्धेनंतर शेफ श्री. तुषार देशमुख ह्यांनी शाकाहारी व मांसाहारी पद्धतीने ५ प्रकारचे पदार्थ करून दाखविले.

ह्या स्पर्धेसाठी सौ. बिंबा नायक ह्यांनी खूप परिश्रम घेतले. स्पर्धेचे सूत्रसंचालन चिटणीस सौ. अक्षदा तळपदे ह्यांनी केले. समाजातर्फे स्पर्धकांना अल्पोपहार देण्यात आला.

पाठारे प्रभु महिला समाजाने रविवार दि. २१ जून २०१५ रोजी सायंकाळी ४ वाजता अधिक महिन्यानिमित्त हळदीकुंकू समारंभ पाठारे प्रभु सोसायटीच्या सांस्कृतिक केंद्राच्या सभागृहात गायत्री मंदिराशेजारी, प्रभु नगर, १२ वा रस्ता, खार (प.) येथे आयोजित केला आहे. या दिवशी महिला सामाजातील भगिनींचा एकपात्री अभिनय कार्यक्रम सादर केला जाईल. तसेच याच दिवशी पुढील स्पर्धा घेण्यात येतील. या स्पर्धा फक्त महिला सभासदांसाठी आहेत.

१) निबंध स्पर्धा : महिलांसाठी :
कै. मालतीबाई रामराव कीर्तिकर स्म. कै. श्रीमती सुप्रिया सुरेन्द्र वैद्य स्म., कै. सौ. निहारीका विलास कोठारे स्म. व कै. श्रीमती लक्ष्मीबाई माधव प्रभाकर स्मरणार्थ -
विषय : मनी वसे ते स्वप्नी दिसे
मुलींसाठी : १५ वर्षाखालील
कै. रोहिणी चंद्रकांत विजयकर स्मरणार्थ -
विषय : माझा वाढदिवस (माय बर्थडे)
शब्द मर्यादा ६०० शब्द. निबंध घरून सुवाच्च अक्षरात परिच्छेद पाडून व कागदाच्या फक्त एका बाजूस लिहून आणणे. तसेच निबंधाच्या कागदावर कोठेही आपले नाव लिहू नये)

२) काव्य स्पर्धा :
कै. सुहासिनी कृष्णराव वाझकर स्मरणार्थ व श्रीमती उषा शिवराज कोठारे पुरस्कृत -
विषय : निसर्ग
(काव्य घरून लिहून आणणे. काव्य सुवाच्य अक्षरात कमीत कमी तीन कडव्यात असावे. तसेच काव्याच्या कागदावर कोठेही नाव लिहू नये.)

दरवर्षीप्रमाणे ज्या मुलींना शिष्यवृत्तीचे अर्ज भरावयाचे असतील त्यांनी ते ३१ जुलै २०१५ पर्यंत सौ. मेघना राणे, श्री सिद्धारुढ प्रसाद, ३६२, ब्लॉक नं. १, १ ला मजला, जे. एस. रोड, मुंबई येथे आणून द्यावेत. तसेच मुलींच्या पदव्युत्तर शिक्षणासाठी महिला समाजाचे आर्थिक सहाय्य मिळू शकेल.

*

# आजी (शब्दचित्र)

-सौ. विजयश्री नवलकर

आजी घरी आल्या. त्यांनी आपल्या तोंडावरून सुरकुतलेला हात फिरविला. त्यांना वृद्धाश्रमात ठेवण्यासाठी इंटरव्ह्यूला नेले होते. आश्रमाच्या समाजसेविकेने त्यांना वेगवेगळे प्रश्न विचारले होते.

''आजी तुम्हाला कोण कोण आहे?''

''मला माझा मुलगा आहे, मुलगी आहे, सून आहे, जावई आहे, नातवंडे आहेत! परंतु मी कुणाची नाही. कारण मला दीर्घायुष्य आहे. मला या दीर्घायुष्याचा कंटाळा आला आहे!''

''आजी तुम्ही काय करीत होतात? चेहऱ्यावरून तर बुद्धिमान दिसता'' समाजसेविकेने पुन्हा प्रश्न विचारला.

''मी एका कॉलेजात प्राध्यापिका होते''

''मग तुमचा पैसा कुठं गेला?'' तिने पुन्हा प्रश्न विचारला.

''माझा पैसा मी मुलांच्या शिक्षणासाठी वापरला. मुलाला इंजिनिअर केले. मुलीला डॉक्टर केले!''

''मग ती दोघे तुम्हाला ठेवावयास तयार नाहीत का?''

''नाही! कारण मी वृद्ध आहे! आणि आता माझ्याजवळ पैसा अगर दागिने नाहीत! माझ्याजवळ काहीही नाही. मी प्राध्यापिका होते, तेव्हा पगार तुटपुंजा असायचा आणि आताच्या पिढीसारखी विद्यार्थ्यांना ट्यूशन्सशी आवश्यकता नव्हती. विद्यार्थी स्वत: मेहनत घेऊन पास होत होते. त्यांना कुठल्याही प्रकारच्या वशिल्यांच्या कुबड्यांची आवश्यकता नव्हती. तो काळ वेगळा होता. त्यावेळी माणसांच्यात माणूसकी होती. आता माणूस हा मनुष्य नावापुरताच उरला आहे!''

संवाद आठवत आठवतच आजी स्वयंपाक घरात आल्या. त्यांना तहान लागली होती. थोडे पाणी प्यायल्यावर आजी क्षमाला म्हणजे आपल्या नातीला म्हणाल्या, ''थोडा चहा कर गं पोरी!'' नातीने १० मिनिटांच्या आतच आजीपुढे चहाचा पेला ठेवला.

त्यांच्या मनात आले, किती छान आहे आपली नात! हिच्याशिवाय माझ्याकडे लक्ष देण्यास कुणालाच वेळ नसतो. ही शाळेत गेली की मी एका केरसुणीसारखी पडते. मनात विचारांचे काहूर माजले. मनातल्या मनात आजी परमेश्वराला शिव्या घालत होत्या... कारे बाबा मला दीर्घायुष्य दिलंस? मला जगण्याचा काय अधिकार आहे? परमेश्वरा, हजारो तरुण लोक तू किड्या मुंग्यांसारखे मारतोस, कुणी अपघातात, तर कुणी साथीच्या रोगात मृत्युमुखी पडतात. मग मीच काय गुन्हा केला आहे महाराजा? मी खरंच का वाईट आहे? चहाच्या गरम पेल्याने आजीचे तोंड भाजले, तेव्हा त्या भानावर आल्या.

चहाचा घुटका घेत घेत आजी आपल्या जुन्या झोपाळ्यावर बसल्या, आणि त्यांच्या नजरेसमोरून पूर्वायुष्याची पाने पुस्तकांच्या पानांप्रमाणे फडफडू लागली. एकेक पान पुढे सरकावे, तसे त्यांना त्यांच्या आठवणी पुन्हा पुन्हा सतावू लागल्या. शरीराच्या आश्रयाने राहणाऱ्या जीवांना प्राणत्याग सहजासहजी करता येत नाही. आपण आपल्या कर्मभोगाला कंटाळलो, तरी ते आपल्याला थोडेच सोडणार? पुष्कळसा प्रवास आपण अनिच्छेने करतो. आपण याच घरात आपल्या यजमानांच्या बरोबर यौवनात असताना पाऊल टाकलं. तो दिवस, त्या रात्री झरझर डोळ्यासमोरून सरकू लागली. त्या प्रेमाच्या ओलाव्यात रुसव्या फुगव्यात काय मजा होती नाही!

सासूबाई शिकलेल्या नव्हत्या, तरी त्यांच्या त्या जुन्या विचारसरणीशी आपण मिळते जुळते घेतले. परंतु आताच्या मुली सासूला अगर आईलासुद्धा मान देत नाहीत. संसाराच्या त्यांच्या कल्पना फार वेगळ्या. आपल्याला वाटलं होतं, सासू जुन्या पद्धतीची आहे, तर आपण आपल्या सुनेला आपली मुलगी म्हणून वागवू, तर तिची तऱ्हा उलटी. तिला माणसंच आवडत नाहीत. तिच्या सुखाच्या कल्पना टी.व्ही. व सिनेमामध्ये असलेल्या नायिकेसारख्या आहेत. आपलं शिक्षण जास्त होतं, म्हणून सासूशी सतत तडजोड केली. कारण मनात सतत भीती असे.

शिक्षणाचा उद्धार होणार नाही ना?

कालांतराने आपल्याला अरविंद झाला. त्यावेळी झालेलं डोहाळेजेवण वगैरे सर्व प्रकार आपण मान्य केले. तसं पाह्यलं तर आपल्याला हे काहीही आवडत नव्हतं. परंतु वडील माणसांचा मान राखण्यासाठी आपण सर्वकाही मान्य केलं. मुलाच्या पाठीवर मुलगी जन्माला आली. कॉलेज, घर आणि मुलांची देखभाल यातच आपला वेळ जात होता....

घरातील प्रत्येक माणसाकडे आजी त्यावेळी लक्ष देत असत. त्यांचा मुलगा अरविंद बोलता बोलता मोठा झाला. त्याला इंजिनियरींग कॉलेजात घालण्यास पैसे नव्हते, तेव्हा आजीने स्वत:चे तोडे बांगड्या विकून पैसे भरले. कालांतराने त्यांची मुलगी अरुणा हिलासुद्धा मेडिकल कॉलेजात प्रवेश घ्यायचा होता. उरलेले दागिने तिच्या शिक्षणासाठी आजीने विकले. आणि अचानक त्यांच्यावर कुऱ्हाड कोसळली. त्यांचे यजमान हृदयविकाराच्या झटक्याने मरण पावले. आजींच्या सासूबाई मुलाच्या धक्क्याने गेल्या. आणि स्वत:च्या दोन मुलांना मोठे करून वर आणण्यासाठी आजीने आपले सर्वस्व पणाला लावले. तुटपुंज्या मिळकतीत मुलगा इंजिनीयर व मुलगी डॉक्टर झाली.

मुलीला एका मोठ्या घराण्यातील डॉक्टर मुलालाच दिले आणि ती आपल्या नवऱ्याबरोबर अमेरिकेला निघून गेली. काही वर्षे तिने आईशी संबंध ठेवला, आणि कालांतराने ती आपल्या व्यवसायात, संसारात गुरफटून गेली. आजीने अरविंदाचे लग्नसुद्धा त्याने पसंत केलेल्या मुलीशी लावून दिले. सुनेला त्रास होऊ नये म्हणून आजी तिला खूपच मदत करीत असत. परंतु त्यांचे व सुनेचे कधीही पटले नाही. शिकल्यासवरलेल्या सासूला सून नेहमीच कमी लेखत होती. हाणून पाडून बोलत होती. कारण त्यांच्याकडे आता पैसा नव्हता, दागिने नव्हते. फक्त प्रेम शिल्लक होते. परंतु हल्लीची पिढी प्रेमाला दरिद्री समजते, व पैशाला श्रीमंत समजते. त्याला कोण काय करणार?

आजींना खूप आनंद झाला. पुढच्या महिन्यापासून आपण एका वेगळ्या जगात रहावयास जाणार. आपल्यासारखेच समवयीन दुर्दैवी जीव आपल्याला भेटणार, आणि मरण येईपर्यंत आपण या जीवांना आपले सुखदु:ख सांगणार. त्यांचे दु:ख ऐकून सांत्वन करणार, आणि समदु:खी जीव एकमेकांना दिलासा देत राहणार. आपल्या या नवीन विश्वाच्या कल्पनेने आजी सुखावल्या. मरणापूर्वीचा हा आपला पुनर्जन्मच आहे. मग हे डोळ्यात अश्रू का? हे आनंदाश्रू आहेत...

आजींना दु:ख वाटत होते ते त्यांची नात त्यांना रोज भेटणार नव्हती. आलीच तर धावतपळत.

पुन्हा एकदा आजीच्या विचारांनी झेप घेतली.... खरंच आपण आपलं घर अरविंदाच्या नावावर का करून दिलं? त्याचं फळ म्हणजेच त्यांनी मला आज वृद्धाश्रम दाखवला! आयुष्यात केलेल्या चुकांना अशी महाभयंकर शिक्षा मिळते! त्यादिवशी कुणीतरी असंच गंमत म्हणून म्हणत होतं 'Marriage is not so pleasant thing!' आणि तरी प्रत्येकजण या फेऱ्यात सापडतो, आणि जखमी झाला की बँडेज लावण्याचा प्रयत्न करतो. आपण आपल्या मुलाला लहानाचा मोठा केला, मुलीला वाढवलं, परंतु आपल्याला स्वत:ला काय मिळालं? तर वृद्धाश्रम! परमेश्वरानं सध्या हा पाचवा आश्रम निर्माण केला आहे. आपली ती मैत्रीण सुनंदा! लग्नाशिवाय राहिली. काय वाईट झालं? स्वत:च्या घरात राहते. फिरते हिंडते, आणि मजा करते. मी मात्र पंख तुटलेल्या पाखरांप्रमाणे झाले आहे...

पुन्हा पुन्हा त्यांच्या डोळ्यासमोर लहानपणीचा अरविंद दिसत होता. त्याला टॉयफाईड झाला, तेव्हा त्या सतत त्याच्या कपाळावर कोलन वॉटरच्या घड्या ठेवून ताप उतरवत बसल्या होत्या. त्याचं अपेन्डिसायटिस ऑपरेशन झाले, तेव्हा रुग्णालयात रात्रीच्या रात्री जागून त्याची सेवा केली. तो बरा व्हावा म्हणून आजी नवसही बोलल्या होत्या. हे सारे आजींना आठवू लागले.

मात्र, जेव्हा आजींना एकदा ताप आला तेव्हा अरविंद व अरुणा त्यांच्या पायाशी रडत बसले होते. 'आई' म्हणून आपल्या भोवती पिंगा घालणारी हीच मुले आपली का, असा संभ्रम त्यांना पडला. त्या मनात म्हणाल्या, तुला माझा आशीर्वाद आहे! हाच आशीर्वाद मला तुझ्या आजीनं दिला का, की पोरी, तुला वृद्धाश्रमातच मरण येईल म्हणून? सांग अरविंदा, मी काय गुन्हा केला म्हणून मी तुम्हा सर्वांना नकोशी झाले? तुम्ही वृद्ध होणार नाही का? केवळ म्हातारपण म्हणून का आम्हा वृद्धांना निवांतपणे राहण्यास वृद्धाश्रमच आहे?

थोडावेळ थांबून त्या आकाशाकडे पाहू लागल्या. मनात म्हणाल्या, 'परमेश्वरा, तुझे आभारच मानते. कारण तू आमच्यासारख्या वृद्धांना मानाने जगण्यासाठी वृद्धाश्रमांची स्थापना केलीस. माळी जिथं पाणी घालतो, तिथंच ते धावतं. परमेश्वरा, तू आमचा माळी आहेस, जिथं पाठवशील तिथं आम्ही सुखानं राहू! आपलं कर्तव्य आपण केलं, परंतु मुलांना स्वत:चं असं कर्तव्य काहीच उरलं नाही का? लाकडाला अग्नी लागला की लाकूड संपूर्णपणे जळतं, उरतो फक्त कोळसा. तसं आपलं जीवन म्हणजे कोळसाच नव्हे काय? जाऊदे झालं! आता मनात भावना शिल्लकच नाहीत. आपल्या मनाला अग्नी कधीच जाळून गेला आहे. उरले आहे फक्त शरीर! तरुणपणी वाटायचं आपल्या जीवनाची नाव कधी बुडणारच नाही. आपण राजरस्त्याने जातो, म्हणून ठेच लागणारच नाही. परंतु म्हातारपणी आपल्या जीवनाची नाव कुठल्याही सागराला नदीला वल्हवायला आपल्याला आवडत नाही! अरे अरविंदा, तुझ्या आजीचं दुखणं मी काढलं व त्या बऱ्या झाल्या तेव्हा मला त्या म्हणाल्या होत्या, ''पोरी सदा सुखी रहा.''

आजींना एक दिलासा होता, तो म्हणजे वृद्धाश्रमात प्रत्यक्षत: प्रवेश करण्याचा दिवस. त्या दिवसाची वाट पाहणं, हाच आता एक मोठा विरंगुळा त्यांना वाटत होता. त्या प्रवेशाच्या दिवसाची कल्पना करीत त्या पहुडल्या... त्यांना लगेच निद्रेने आपलेसे केले!

*

## प्रभु तरुण आश्रयदाते

१) सौ. विमल व श्री. माधव नायक,
२) सौ. नलिनी व श्री. रविंद्र रामराव मानकर,
३) सौ. अनामिका बी. ए. एल.एल.बी.
४) कै. नटवर्य नारायण रामराव झावबा
५) कै. सॉ. मोतिराम विनायक जयकर
६) आद्य संपादक कै. विष्णु कृष्ण कोठारे
७) कै. रावसाहेब चंद्रकांत बालमुकुंद वेलकर
८) कै. सौ. सुशीला यशवंतराव कीर्तीकर
कै. सौ. सुशीला व श्री. मोरेश्वर वि. प्रधान
९) सौ. मीरा व श्री. रविंद्र नानूजी दळवी
१०) कै. सौ. शलाका (अरुणप्रभा) शैलकुमार श्रीकृष्णनाथ दळवी
११) कै. श्रीमती चंपुबाई आणि
कै. आनंदराव सुंदरजी धराधर
१२) कै. सौ. रोहिणी (रत्नप्रभा) श्रीकर राणे
१३) सौ. निलीमा व श्री. सूजन केशवराव राणे
१४) कै.श्रीमती रोझाबाई आणि कै. बाळाराम केरोबा नायक
१५) कै. शरद विनायक कीर्तिकर यांच्या स्मरणार्थ अनामिक
१६) कै. सॉ. दिलीप रघुनंदन कोठारे
१७) कै. श्रीमती कमलजा आनंदराव अजिंक्य
१८) कै. दिवाळीबाई व कै. डॉ. वामनराव आनंदराव विजयकर
१९) कै. विष्णुराज बाळाराम नायक
२०) ॲड. सदाशिव आनंदराव धुरंधर
२१) कु. कस्तूर मोठाबाई जयकर
२२) कै. कमलिनी रमाकांत प्रधान
२३) कै. नटवर्य शरद श्रीकृष्णनाथ गणपतराव दळवी
२४) आद्य मराठी लघुलिपीकार कै. भुजंगराव रामचंद्र मानकर
२५) कै. वामन मोरेश्वर प्रभाकर
२६) कै. चंद्रकांत नारायण विजयकर,
कै. कुंजविहारी वाय. जी. तळपदे,
कै. प्रविण चंद्रकांत नारायण, विजयकर,
कै. वैभव कुंजविहारी वाय. जी. तळपदे
यांच्या स्मरणार्थ एक हितचिंतक
२७) कै. डॉ. विद्याधर चंद्रकांत नारायण विजयकर यांच्या स्मरणार्थ हितचिंतक
२८) कै. पूर्णचंद्र केशरीनाथ राव व
कै. सौ. शीला पूर्णचंद्र राव यांच्या स्मरणार्थ
२९) डॉ. राम गोविंदराव नवलकर
३०) सौ. शुभांगी राम नवलकर
३१) सौ. रीटा आणि श्री. मंदार माधवराव नायक
३२) कै. सौ. विजया व श्री. प्रकाश माधव नायक या त्यांच्या आईवडिलांच्या स्मृत्यर्थ उन्मेष प्रकाश नायक
३३) सौ. वृंदा आणि श्री. शाम विनायक जयकर
३४) कै. श्रीमती जयश्री आणि कै. श्री. जयवंत विश्वनाथ कीर्तिकर स्मृत्यर्थ श्री. उमेशचंद्र जयवंत कीर्तिकर
३५) कै. श्रीमती प्रतिमा आणि कै. श्री. धाकलेश्वर बाळाजी जयकर स्मृत्यर्थ सौ. सुप्रिया उमेश कीर्तिकर


## प्रभुतरुणाची डायरी

### बाळा जो जो रे

०४-०४-१५ सौ. मिताली आणि श्री. अभय अनंत राव, कन्या, अंधेरी

### आत्याबाई नाव बोला

कु. झेनिया अभय राव

### कुर्यात् बटोर्मंगलम्

२३-०४-१५ अर्णव आलोक धराधर
०८-०५-१५ कपिल श्रीनाथ जयकर
२४-०५-१५ अरुष कुणाल जयकर

### नांदा सौख्यभरे

२४-०५-१५ श्री. निहाल निखील अजिंक्य, कु. सारा रोझवाड (आं. ज्ञा)
३०-०५-१५ श्री. मोनित रसिक विजयकर, कु. भावना रवींद्र काडगे (आं. ज्ञा.)

### मरण

| | | | |
|---|---|---|---|
| १३-०५-१५ | श्री. आशुतोष जयवंत जयकर, | वय ५२, | दादर |
| २३-०५-१५ | श्रीमती हेमलता चंद्रकांत धैर्यवान, | वय ९०, | कलानगर,वांद्रे (पू.) |
| २८-०५-१५ | श्री. सुबोध वामनराव व्यवहारकर, | वय ७८, | मालाड (पू.) |
| ३१-०५-१५ | श्री. विलास खंडेराव कोठारे, | वय ७९, | नालासोपारा (प.) |
| ०५-०६-१५ | श्री. प्रभात वसंतराव जयकर, | वय ८६, | भटवाडी, ऑपेरा हाऊस |
| ०६-०६-१५ | श्री. पांडुरंग यशवंतराव नवलकर, | वय ९०, | सांताक्रूझ (प.) |
| ०७-०६-१५ | डॉ. गंधाली जयवंत कोठारे, | वय ४५, | मालाड (प.) |
| ०८-०६-१५ | श्री. श्रीपाद नारायण धैर्यवान, | वय ८६, | खार (प.) |
| ०८-०६-१५ | श्री. कृष्णराव आनंदराव कोठारे, | वय ८९, | विलेपार्ले |

## प्रभुतरुणास देणगी

✶ सौ. आशा आणि श्री. सुधीर रामचंद्र राव, पुणे यांजकडून रु. १०००/-

✶ श्री. चंदन एस्. कीर्तिकर यांजकडून आजीव सदस्यत्व रु. ५००/-

✶ सौ. प्रणिता आणि श्री. अरविंद आनंदराव धराधर यांजकडून (२३ एप्रिल रोजी) त्यांचा नातू अर्णव आलोक धराधर याच्या मौजीबंधनाप्रीत्यर्थ रु. १०१

## परीक्षेतील सुयश

### पोस्ट ग्रॅज्युएट डिप्लोमा इन मार्केटिंग मॅनेजमेंट

श्री. अक्षय अंजन कोठारे, प्रथम वर्ग ६७ %

### उच्च माध्यमिक परीक्षा

### बारावी (सायन्स)

कु. निकीता महेश जयकर, ८६.४६ टक्के

### बारावी (कॉमर्स)

शौनक कौशिक जयकर, ७९.०४ टक्के

### बारावी (सायन्स) निर्मला निकेतन

कु.धनश्री चेतन कोठारे, ७३ टक्के

## अभिनंदन

✶ श्री. महेश अंबर कोठारे यांच्या सिनेजगातील अभिनेते, दिग्दर्शक, निर्माते कारकिर्दीला पन्नास वर्षे झाल्याबद्दल डॉ. काशीनाथ घाणेकर सभागृहात शानदार सोहळा झाला. दूरदर्शनतर्फे त्यांना 'चित्ररत्न' पुरस्कार प्राप्त झाला. अभिनंदन.

✶ 'हिंदुस्थान टाइम्स'च्या वार्ताहर स्वाती वर्मा पाठारे प्रभु ज्ञातीची माहिती घेण्यासाठी सुहासिनी कीर्तिकर यांना भेटल्या. त्यावेळी पा. प्र. महिला समाजाच्या शताब्दी वर्षाविषयी माहिती मिळाल्यावर त्यांनी सौ. वृंदा जयकर, वंदना नवलकर, संजना कोठारे यांची भेट घेतली. महिला समाजाविषयीची बातमी 'हिंदुस्तान टाइम्स' मध्ये छायाचित्रासह सविस्तर दिली गेली. (मात्र अनवधानाने त्यांनी सुहासिनी कीर्तिकरांचा उल्लेख 'प्रभुप्रभात'ची संपादिका असा केला!) महिला समाजाचे अभिनंदन.

✶ 'टॉम ॲण्ड जेरी' या निखील रत्नपारखीच्या नाटकाची प्रकाश योजना श्री. शीतल तळपदे यांची आहे; तर स्थिरचित्रण श्री. नंदू धुरंधर यांचे आहे. मिलींद बोकील यांच्या 'संकेत' कथेवर आधारित प्रायोगिक नाटकाचे नेपथ्य स्वप्नील जयकर यांचे आहे. अभिनंदन.

✶ सौ. आशा आणि श्री. सुधीर रामचंद्र राव, पुणे यांची कन्या सौ. पूर्वा जैश हिला गंधर्व महाविद्यालय, पुणे ह्यांच्या प्रारंभिक भरत नाट्यम परीक्षेत दुसरा क्रमांक मिळाला. तसेच नातू कु. आरुष (वय ७) ह्याला 'सीप', आंतरराष्ट्रीय शिक्षण संस्थेच्या ॲबॅकस परीक्षेत पहिल्या तीन लेव्हल्समध्ये प्रत्येकी १०० टक्के गुण व सुवर्णपदक मिळाले.

तसेच बालेवाडी पुणे येथील डिस्ट्रिक्ट लेव्हल स्पर्धेत ५ मिनिटात जास्तीत जास्त बेरीज (सम्स्) करणे ह्यात पहिली उपविजेता ट्रॉफी मिळाली. अभिनंदन.

## चुकीची दुरुस्ती

मार्चच्या अंकातील देणगी सदरात गौरव अमोल क्रिश्नलाल रणजीत यांच्या विवाहानिमित्त जना रवींद्र नानुजी नवलकर यांजकडून देणगी होती. गौरवच्या ऐवजी वैभव असे नाव छापल्या-बद्दल दिलगीर आहोत. तसेच चुकीने नानुजी ऐवजी नागुजी छापले गेले. क्षमस्व.

## पत्र-प्रतिक्रिया

संपादिका
'प्रभुतरुण'

विषय - रामवाडी राम मंदिरातील 'रंगोत्सव २०१५' च्या वृत्तांकनाबाबत खुलासा पत्र

महोदया,

रामवाडी राम मंदिरातील 'रंगोत्सव २०१५' कार्यक्रमास वेळात वेळ काढून आपली विशेष उपस्थिती लाभली व आपण विशेष वृत्तांकनही केलेत. सहकार्यासाठी मन:पूर्वक धन्यवाद. मात्र अनवधानाने सदर वृत्तांकनात काही उल्लेख आले नाहीत. त्यावर कोणाचा गैरसमज होऊ नये म्हणून माझे सदरचे 'खुलासापत्र' या पुढील 'प्रभुतरुण' मध्ये कृपया प्रकाशित करावे ही विनंती.

सहकार्यासाठी पुनश्च धन्यवाद.

### खुलासा पत्र

रामवाडी राम मंदिर-काळबादेवी येथील पारंपारिक 'रंगोत्सव २०१५' चे वृत्तांकन (प्रभुतरुण - एप्रिल २०१५) मधील मंदिराचे ऑ. व्यवस्थापकांचे पोशाख संबंधी वर्णनात पाठारे प्रभु ज्ञातीच्या जुन्या जमान्यातील पोशाखाशी तुलना झाली होती, मात्र तसे काही जाणीवपूर्वक झाले नव्हते. केवळ मंदिरातील दैनंदिन पुजारी सेवेप्रसंगी नेसलेले रोजचेच 'सोवळे' व उत्सव प्रसंगीचे सदरा टोपी असा साधा पेहराव होता. असो.

त्याचप्रमाणे मंदिराचे विद्यमान अध्यक्ष विश्वस्त श्री. प्रताप मो. बा. वेलकर यांची नुकतीच मोठी शस्त्रक्रिया झाल्यामुळे बेडरेस्ट निमित्ताने नाईलाजास्तव उपरोक्त कार्यक्रमास उपस्थिती होऊ शकली नाही. अशाही बिकट अवस्थेत त्यांनी जातीने लक्ष घालून सदर कार्यक्रमाचे नियोजन केले. व सहकारी विश्वस्त श्री परिमल एम. तळपदे आणि श्री रंजन के विजयकर यांच्या परिश्रमामुळे कार्यक्रमाची रंगत अधिकच वाढली व याच मंदिराचे माजी अध्यक्ष विश्वस्त स्व. डॉ. मोतीराम बा. वेलकर यांनी समकालीन (१९२२-१९५०) सहकारींच्या विरोधाला न जुमानता केवळ राष्ट्रसेवेसाठी देशभक्तांवरील कीर्तन परंपरा अखंडित प्रमाणे याही वेळेस 'गीत सावरकरायन' मुळे मंदिरातील क्रा. चापेकर स्मारकाचा उचित सन्मानच झाला. पुढील पिढीस अभ्यासू इतिहास ज्ञात व्हावा म्हणून हा पत्रप्रपंच. धन्यवाद

ऑ. व्यवस्थापक
अरविंद प्र. धुरंधर

(पत्रात 'अनवधानाने सदर वृत्तांतात काही उल्लेख आले नाहीत' असे म्हटले आहे. मात्र मी सहमत नाही. 'काही विश्वस्त उपस्थित होते' या विधानात काहीही सत्यालाप नाही. श्री. प्रताप वेलकरांबाबत उल्लेख नव्हता; तसा इतर विश्वस्तांबाबतही उल्लेख नव्हताच. पोषाखाविषयी आणि या कार्यक्रमाविषयी मी उदात्तीकरण करूनच एक सोहळा म्हणून **अवधान ठेवून** वृत्तांकन केले. त्यामुळे कोणाचे गैरसमज होणार असतील तर यापुढे 'रामवाडी येथील राममंदिरात रंगोत्सव सणानिमित्त कीर्तनाचा कार्यक्रम झाला. अगदी मोजकीच श्रोतृसंख्या कार्यक्रमाला लाभली.' अशा आणि इतक्याच वाक्यात मला बातमी द्यावी लागेल; याची संबंधितांनी कृपया नोंद घ्यावी. (कमी श्रोते असल्याबद्दल खंत यावर्षीच्या कीर्तनकारांनीही व्यक्त केली. ते म्हणाले की माझ्या पैशाने मी जाहिरातही दिली, तरी अशा कार्यक्रमाला श्रोते बहुसंख्येने यावेत.)

प्रतिक्रिया दिल्याबद्दल धन्यवाद.

-संपादक

हे मासिक मुद्रक, प्रकाशक श्रीमती सुहासिनी कीर्तिकर यांनी मालक बोर्ड ऑफ कंट्रोल प्रभुतरुण करिता मे. स्नेहेश प्रिंटर्स, ३२०-अ, शाह अँड नाहर इंडस्ट्रीयल इस्टेट, अ-१, धनराज मिल कंपाऊंड, सीताराम जाधव मार्ग, लोअर परेल, मुंबई-४०००१३ येथे छापून पारिजात बी-३, युनियन बँक एम्प्लॉईज को-ऑप. हौ. सोसायटी, पटेल इस्टेट, जोगेश्वरी (प.), मुंबई-४००१०२ येथे प्रकाशित केले.

संपादक: श्रीमती सुहासिनी कीर्तिकर RNI NO. 14613/67